ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Refered
and UGC Listed Journal
ISSN 2277 - 5730


An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

# AJANTA

VOLUME - VII, ISSUE - I
JANUARY - MARCH - 2018

IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 5.2
www.sjifactor.com

## MARATHI



AJANTA
PRAKASHAN

Scanned by CamScanner

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - I MARATHI January - March - 2018

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2017 - 5.2**
**www.sjifactor.com**

❖ **EDITOR** ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ **PUBLISHED BY** ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

VOLUME - VII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.2 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारत आणि आंतरराष्ट्रीय संघटना<br>**आकाश शेषराव बांगर** | १-५ |
| २ | स्वयंसहाय्यता बचत गट महिला सबलीकरणाचे एक प्रभावी साधन<br>**बांगर नितीनकुमार बाबासाहेब** | ६-११ |
| ३ | वर्तमान समाज व्यवस्थेतील नैतिकता आणि जबाबदारी<br>**श्री नरवाडे बालाजी मारोतराव** | १२-१६ |
| ४ | प्रचलित म्हणी आणि लिंगभाव विषमता<br>**मोहिनी कनकदंडे** | १७-२१ |
| ५ | तडवी लोकगीतातील सामाजिक जीवन<br>**प्रा. मुकेश ए. सावळे** | २२-२६ |
| ६ | भारतातील स्त्री सबलीकरणाच्या तरतुदींचा अभ्यास<br>**प्रा. कमलाकर शरद इंगळे** | २७-३० |
| ७ | जागतिकीकरण आणि भारतीय व्यवस्था एक चिंतन<br>**प्रा. डॉ. महेश नारायण मोटे** | ३१-३९ |
| ८ | माहिती संप्रेशण तंत्रज्ञान आणि डिजिटल ग्रंथालय - एक दृष्टीक्षेप<br>(ICT and Digital Library  A Review)<br>**कु. शारदा लांजेकर**<br>**अनिल भोयर** | ४०-४४ |
| ९ | स्त्रियांना सन्मानाची वागणूक व समान संधी उपलब्ध करून देणे हे कर्तव्य नव्हे तर राष्ट्रीय जबाबदारी आहे<br>**प्रा. चंद्रप्रभा निकम** | ४५-५३ |
| १० | जागतिकीकरणाचा भारतातील मासेमारी व्यवसायावरील परिणाम<br>**श्रीमती जिनल गोपीनाथ घरत** | ५४-५८ |
| ११ | कोल्हाटी जमातीचे सामाजिक – सांस्कृतिक साहित्य<br>(Socio-Literature of Kolhati Women)<br>**सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार** | ५९-६५ |





Scanned by CamScanner

VOLUME - VII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.2 (www.sjifactor.com)

# ११. कोल्हाटी जमातीचे सामाजिक – सांस्कृतिक साहित्य
## (Socio-Literature of Kolhati Women)

**सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार**
संशोधक विद्यार्थीनी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**प्रस्तावना–**

भारतीय समाज विविध संस्कृती व परंपरांनी नटलेला आहे. भारतातील वैशिष्ट्य म्हणजे समाजाबरोबरच विविध जाती व जमातींचा समावेश होतो. प्रत्येक जात व जमात आपल्या संस्कृतीचा पुरस्कार करताना दिसते. अशाच प्रकारे भटक्या विमुक्त जाती जमातीपैकी एक कोल्हाटी जमातीचे सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टयांचे वर्णन निवडक साहित्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. नृत्य, लोकमनोरंजन हा पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या या कलावंत समाजाच्या विश्लेषणासाठी साहित्याचा आधार घेण्यात येणार आहे. यामध्ये प्रकर्षाने एक गोष्ट जाणवते की, कोल्हाटी जमातीविषयीचे साहित्य अत्यल्प व दुर्मिळ आहे व त्यामध्ये भर पडण्याची आवश्यकता आहे.

अनेक प्राचीन विचारवंतांनी 18 व्या शतकापासून विविध जाती–जमातींच्या निरिक्षणात्मक अध्ययनास सुरुवात केली होती. त्यासाठी ते प्रत्यक्ष या जमातींना भेट देवून माहितीचे संकलन करीत होते. त्यांच्या निरिक्षणातून निर्माण झालेल्या ग्रंथांचा उपयोग आजही या जमातींच्या वैचारिक अभ्यासासाठी होत आहे. त्यापैकी R.V.Rusell, R. E. Enthoven हे ब्रिटिश ग्रंथकार तर त्रिं.ना.अत्रे, सतीशकुमार जाधव यांनी व अनेक प्रसिध्द विचारवंतांनी साहित्याच्या माध्यमातून कोल्हाटी जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टयांवर प्रकाश टाकला आहे.

**शोधनिबंधाची/संशोधनाची वैशिष्टये–**

1. कोल्हाटी जमातीविषयीच्या साहित्याचा आढावा घेणे.
2. विशिष्ट साहित्यातून कोल्हाटी जमातीची सामाजिक वैशिष्टये अभ्यासणे.
3. विशिष्ट साहित्यातून कोल्हाटी जमातीची संस्कृती स्पष्ट करणे.
4. जागतिक साहित्यातील कोल्हाटी जमातीचा अभ्यास करणे.

**गृहितके–**

1. प्राचीन काळापासून साहित्यामध्ये कोल्हाटी जमातीचे अस्तित्व दिसून येते.
2. कोल्हाटी जमातीविषयीचे लिखित, साहित्य अल्प व दुर्मिळ असल्याचे दिसते.

**संशोधन पध्दती–**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे. यापध्दतीसाठी दुययम स्त्रोताचा आधार घेतला आहे. विविध संदर्भ ग्रंथांचा आढावा घेवून त्यामधून मोजक्या लेखकांनी लिहिलेल्या कोल्हाटी जमातीवरील ग्रंथांचा आधार घेतला आहे. या ग्रंथांमधून कोल्हाटी जमातीची सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टये अधोरेखित करण्यात आली आहेत.



Scanned by CamScanner

**साहित्याविषयी विश्लेषण–**

कोल्हाटी जमात ही एक भटकी–विमुक्त जमात आहे. भटक्या विमुक्तांवरती बरेच लेखन झालेले आहे. परंतु त्यामध्ये कोल्हाटी समाजावर लिखाण व भाष्य करणारे लेखक मोजकेच आहेत.त्यांनी या जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्टयांचा अभ्यास आपल्या ग्रंथात मांडला आहे तो पुढीलप्रमाणे.

1. Gazetter of the Bombay Presidency (Ahmadnaar District) (1884)[1]-

Government Central Press Mumbai यांनी गॅझेटर या शासकीय अभ्यास ग्रंथामध्ये अहमदनगर जिल्हयाबरोबरच जिल्हयात वास्तव्यास असणाऱ्या जाती–जमातींचा अभ्यास मांडण्यात आला आहे. यामध्ये कोल्हाटी जमातीची आगळी वेगळी वैशिष्टये मांडण्यात आली आहे. “कोल्हाटी हे भटके म्हणून अकोला वगळता सर्व जिल्हाभर आढळतात. ते दिसायला नीटनेटके विशेषतः स्त्रिया दिसायला नीट नेटक्या आहेत”. या गॅझेटियर मधील कोल्हाटी स्त्रीच्या वर्णनावरुन स्त्रियांच्या देखणेपणाची जाणीव होते. या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे भटक्या जमातीतील कोल्हाटी जमात त्यांचे झोपडे संसार डोक्यावर किंवा गाढवावरुन वाहतात. म्हणजेच ही जमात भटकंतीचे जीवन जगत असल्याचे दिसते. गॅझेटियरमध्ये कोल्हाटी जमातीची काही ठळक वैशिष्टये अभ्यासायला मिळतात.

2- Syed Siraj Ul Hasan 1920[2]-

सय्यद सिराज उल हसन यांनी आपला ‘The Caste & Tribes of H.E.H., The Nizam's Dominions’, Vol-I ग्रंथामध्ये विविध जमातीविषयी माहिती मांडलेली आहे. त्यापैकी कोल्हाटी जमातीविषयी ते सांगतात, “कोल्हाटींच्या तीन उपजाती आहेत. पाल/काने कोल्हाटी, डुक्कर/पोटरी कोल्हाटी, डोंबारी कोल्हाटी”. मराठवाडयाच्या सर्व जिल्हयांमध्ये त्यांचे अस्तित्व दिसते. यावरुन सय्यद यांनी कोल्हाटी जमातीतील तीन पोटजाती स्पष्ट केलेल्या दिसतात. तसेच या समाजाची अंतर्गत रचना स्पष्ट करताना ते सांगतात ज्यांचे विवाह गोत्राबाहेर किंवा अगोत्री झाले आहेत असे कोल्हाटी मराठी समाजाची वैशिष्टये धारण केलेले वाटतात. गायकवाड, शिंदे, पवार, जाधव, कचरे इ. एकाच गोत्रात किंवा सगोत्री विवाहास मान्यता नाही. परंतु एक पुरुष दोन मुलींसोबत ज्या सख्ख्या बहिणी असू शकतात त्यांच्याशी लग्न करु शकतो किंवा दोन सख्खे भाऊ दोघी बहिणी असणाऱ्या मुलींबरोबर लग्न करु शकतात. अशाप्रकारे लग्नाबाबत जमातीतील अंतर्गत वैशिष्टय सय्यद यांनी स्पष्ट केलेले दिसते.

3- R.V.Rusell & Harilal, (1975)[3]-

यांनी ‘The Tribes & Castes of the central provinces of India, Vol- III या ग्रंथामध्ये कोल्हाटी जमातीची विविध प्रांतामध्ये विविध नावे सांगितली आहे. कोल्हाटी जमातीस दांडेवाले, बंसबेरिया, कबुतरी या नावानेही ओळखले जाते. तसेच त्यांच्या ग्रंथानुसार उत्तर व मध्य भारतात आढळणारी बेरिया व मध्य भारतात आढळणारी सेन्सेशिया या जमाती कोल्हाटी जमातीशी साधर्म्य राखतात. बेरिया ही जात कोल्हाटी जमातीची एक शाखा असून ती दख्खन मध्ये स्थिर स्थावर झालेली दिसते. Rusell च्या मते, “समाजातील लग्न झालेली स्त्री ही पुरुषांसमोर नाचगाण्याचे काम करीत नाही व ती इतर जातीतील स्त्रियांएवढीच पवित्र समजली जाते”. यावरुन कोल्हाटी समाजात गृहिणी कोल्हाटी स्त्रीचे पावित्र्यावर प्रकाश टाकलेला दिसतो.



Scanned by CamScanner

4- R. E. Enthoven, (1990)[4]-

Enthoven यांनी आपल्या 'The Tribes & Castes of Bombay' या संदर्भ ग्रंथात विविध जाती जमातींच्या वैशिष्ट्यांचे वर्णन केलेले दिसते. त्यामध्ये एकुण 483 जातींचा अभ्यास केला आहे. Enthoven च्या मते कर्नाटक मध्ये कोल्हाटी समाजास 'डोंबारी' व अहमदनगरमध्ये 'खेळकरी' म्हणून ओळखले जाते. Enthoven ने विवाह पध्दती विषयी प्रमुख वैशिष्ट्यांचा उल्लेख केलेला आहे. "कोल्हाटी समाजात बहुपत्नीत्वास परवानगी आहे व घटस्फोटाला परवानगी आहे. तसेच विधवा विवाहास मान्यता आहे". या ठळक मुद्दयांवरुन कोल्हाटी जमातीतील विवाहसंबंधी नियम प्राचीनकाळापासून आधुनिक असल्याचे दिसतात.

**5. त्रिं.ना. अत्रे (पुर्नमुद्रण 1995)[5]–**

'गावगाडा' हा ग्रंथ अत्रेंनी 1915 साली लिहिला. त्याकाळाची गावगाडयाची परिस्थिती व वर्तमान परिस्थितीत खूप बदल झालेला दिसून येतो. तरीही अत्रेंनी प्राचीन काळातील महत्वपूर्ण संकल्पनांची उकल केल्याचे दिसते. त्यांच्यामते, कोल्हाटी जमातीतील मुलगी वाणढाळ असेल तर तिचे लग्न लावून देतात तर रुपवान असेल तर तिला नायकीण करतात. या नायकीणीला कुटंबात जसे प्रमुखाला घर जबाबदारी असते तसे आई–बाप, भाऊ–भावजया वगैरेंना पोसावे लागते. एक कोल्हाटीण अत्रेंना म्हणाली, "मी जर हा धंदा सोडला तर म्हातारपणी आई–बाप कोठे जातील? भावांची लग्न कार्ये कशी होतील?" यावरुन अत्रे सांगतात हा धंदा अब्रुदार असता तर या मायाळूपणाला मोल नाही. यावरुन कोल्हाटी कलावंतीन स्त्री म्हणजेच नायकीणीच्या जीवनात असलेली कौटुंबिक आर्थिक जबाबदारी गावगाडयातून व्यक्तीत होते.

**6. के.एस. सिंग (1998)[6] –**

सिंग यांनी आपल्या 'PEOPLE OF INDIA', National Series Volume V, India's Communities मध्ये कोल्हाटी जमातीची माहिती मांडलेली आहे. सिंग यांनी Rusell प्रमाणे कोल्हाटी जमातीचा 'बेरिया' समाजाशी संबंध लावला आहे. रसेल व हरिलाल आणि सिंग यांच्या म्हणण्यानुसार या जमाती समान आहेत. त्यांचे स्थान स्पष्ट करताना ते म्हणतात, हे दक्षिण भागात स्थायिक झालेले आहेत तर उस्मानाबाद, लातूर, सोलापूर व अहमदनगर जिल्हयात ते विखुरलेले दिसतात. मराठी ही त्यांची मातृभाषा असून हिंदी व उर्दू भाषा ते चांगल्यापैकी बोलतात.

**7. गोविंद कालेलकर (प्र.आ.1928, पुर्नमुद्रण 1997)[7]–**

20 व्या शतकातील सुरुवातीला यांनी मुंबई प्रांतात जी माहिती गोळा करुन प्रसिध्द केली. या इंग्रजी माहितीचे मराठी रुपांतराचे काम त्याकाळी गोविंद कालेलकर यांनी केले. या ग्रंथानुसार मुलामुलींची लग्ने बहुधा वयात आल्यावर होतात. मुलीचे लग्न केलेच पाहिजे असे नाही. "मुलगी वयात आल्यावर तू वेश्यावृत्ती स्वीकारणार की लग्न करणार असे विचारतात. जर वडिलांच्या अनुमतीने तिने लग्न करण्याचे ठरविले तर तिची काळजी घेतात". यावरुन या समाजात क्वचित वेश्यावृत्ती आढळते हे स्पष्ट होते. तसेच मुलींना स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले जाते हे दिसते.



Scanned by CamScanner

**8. रामनाथ चव्हाण (प्र.आ.1989 पुर्नमुद्रण 2000)[8] –**

रामनाथ चव्हाण यांनी कोल्हाटी जमातीची ओळख करुन देताना म्हणतात, "परंपरेने चालत आलेल्या विशिष्ट कलागुणांच्या आधारे जे लोकसमूह गावोगावी भटकत चरितार्थ चालवितात त्या समूहापैकी कोल्हाटी समाज महाराष्ट्रात आहे. हा कलावंत समाज म्हणून ओळखला जातो. विशेषतः महिला नाचगाण्याचा व्यवसाय करतात तर महिला व पुरुष मिळून गावोगावी कसरतीचे प्रयोग करताना आढळतात. पारंपारिक कला हेच या समाजाचे चरितार्थाचे प्रमुख साधन मानले जाते". यावरुन या समाजाला उपजिविकेसाठी व पारंपारिक व्यवसायासाठी भटकंती करावी लागत असल्याचे दिसते. या ग्रंथामध्ये रामनाथ चव्हाण यांनी कोल्हाटी समाजाच्या निर्मितीविषयी शंकरपार्वती व गंधर्वकन्येची लोककथा किंवा पुराणकथा मांडलेली आहे. त्यामधून कोल्हाटी जमातीतील क्वचित वेश्यावृत्ती स्पष्ट होते.

**9. रामनाथ चव्हाण (2002)[9] –**

रामनाथ चव्हाण यांनी 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत' खंड–1 मध्ये कोल्हाटी समाजाच्या संस्कृती, आचार, विचार, व्यवसाय, परंपरागत भूमिका, कला, रुढी, पध्दती यांविषयीचे सविस्तर विवेचन केले आहे. चव्हाण यांच्या मते, "कोल्हाटी समाज 12व्या शतकात महाराष्ट्रात आल्याचे सांगितले जाते. मथुरा हे या समाजाचे मूळ ठिकाण असून तेथील 'नट' या नावाने ओळखल्या जाणारया समाजाशी हे आपला संबंध असल्याचे सांगतात. कारण नट यांचा पारंपारिक व्यवसाय व व्यवसायासाठीची पारंपारिक भाषा यामध्ये सार्धम्य आहे". रामनाथ चव्हाण कोल्हाटी जमातीची 12 कुळे सांगतात. 1. गांगवा, 2. काळवा, 3. भोरजा, 4. मुसवात, 5. नय्या, 6. कच्चर, 7. रत्तबा, 8. बिचवा, 9. चंदन, 10. विरपणकर, 11. ब्राम्हणवाले, 12. छडीवाले ही बारा कुळे आहेत.

**10. सतीशकुमार जाधव (2010)[10] –**

जाधव यांनी आपल्या कोल्हाटी समाज आणि संस्कृती या ग्रंथात कोल्हाटी समाजाविषयी धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक माहिती मांडलेली दिसते.त्यांच्यामते कोल्हाटी समाजाचे दुर्दैव म्हणजे या समाजाकडे स्वतःच्या धर्माचा किंवा समाजाचा मूळ धर्मग्रंथ नाही म्हणून हा समाज हिंदू धर्म पध्दतीचे आचरण अमलात आणतो. कारण लिखित धर्मग्रंथ नसल्यामुळे हिंदू धर्माच्या धर्मविषयक नैतिक कल्पना, आचरण पध्दती, पुजा पध्दती, सण उत्सव पध्दती या समाजाने आपल्या जीवनात जशाच्या तशा उचलल्या आहेत. धर्म व संस्कृतीविषयी जाधव सांगतात, "कोल्हाटी समाजात धार्मिक पध्दतीनुसार, पुरुषांची मुंज केली जाते. तसेच धार्मिक कर्मकांड, नवस, प्रथा, परंपरा, यात्रा इ.बाबींना विशेष महत्व दिले जाते. कुलदेवतेच्या ठिकाणी किमान वर्षातून एकदा जावे असा ते संकेत पाळतात. खंडोबा, भैरोबा, कान्होबा, तुळजापुरची देवी, कर्नाटकातील यलम्मा ही त्यांची प्रमुख देवता आहेत". यावरुन कोल्हाटी समाजात अंधश्रध्दा व दैवी कल्पनांचा पगडा असल्याचे दिसते.

**11. प्रभाकर मांडे (2017)[11] –**

प्रभाकर मांडे यांनी त्रिं.ना.अत्रेंच्या प्राचीन 'गावगाडा' ग्रंथाप्रमाणेच 'गावगाडयाबाहेर' हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. 'गावगाडा' या ग्रंथात पूर्वीची अठरापगड जाती–जमातींची स्थिती वर्तविली आहे. परंतु मांडे यांनी आपल्या ग्रंथात या जाती–जमातींच्या परिवर्तन व विकासाचा आढावा घेतल्याचे दिसते. एकेकाळी फिरस्त्यांचे जीवन जगणाऱ्या परंतु आज गावोगावी स्थायिक जातीपैकी कोल्हाटी एक जात आहे. यावरुन मांडे यांनी कोल्हाटी जमात सदयस्थितीत



Scanned by CamScanner

बहुतांशी स्थिर झालेली दिसते असे वर्णन केले आहे. मांडे यांनी कोल्हाटयांचा व्यवसाय, मिशी लावणे, पुरुषांचा मुंजविधी, लग्नविधी,दाढीचूर, तागमान, पाचवी, बारसे, मर्तिकविधी आणि तरपावनी, मिशी उतरविण्याचा कट, कुत्र्याचा कान कापणे, गजिती, सरा टाकणे, जात पंचायत प्रभाव या सर्व संकल्पना, प्रथा, रुढी, पध्दतींची उकल केल्याचे दिसते. पुढे जाऊन त्यांनी कोल्हाटी समाजातील आशादायक परिवर्तन स्पष्ट केले आहे. त्यांच्या माहितीवरुन समाजाची विकासाकडे वाटचाल दिसून येते.

**आत्मचरित्र –**

**1.गोपीचंद पवार (प्र.आ.1998)[12] –**

गोपीचंद पवार हे कोल्हाटी जमातीचे असून त्यांनी जीवनातील प्रत्यक्ष कटू अनुभवांचे चित्रण 'कोल्हाट उडी' या त्यांच्या आत्मचरित्रातून स्पष्ट केले आहे. जमातीतील काही संकल्पना,रुढी, परंपरा, रितीरिवाज मांडत असताना ते कोणताही आडपडदा राखत नाहीत. निडरपणे त्यांनी आपली मते व्यक्त केली आहेत. त्यांचे दुःख मांडताना ते पुढील काव्य लिहितात.

आम्हाला बुध्दी आहे पण वाव नाही
ताकद आहे पण युक्ती नाही
शिक्षणाची सक्ती आहे पण वेळ नाही
भूक आहे पण वाढणारी नाही
मनगटात जोर आहे पण काम नाही
स्त्रिया अबला आहेत पण उद्रेक नाही
काम करावे पण सराव नाही
सर्वांना घरे आहेत पण आम्हाला साधी सावली नाही
अंगात कला आहेत पण तिला बघत नाहीत
बघतात पण हिच्याशी जमत का नाही?

अशाप्रकारे त्यांनी जातीचं जीवन अडपडदा न ठेवता समाजाचे चित्रण केले आहे. या आत्मचरित्राचे वैशिष्टय म्हणजे त्यांना जातपंचायतीचे चटके सोसून मिळालेले अनुभवावरुन पूर्वी जमातीमध्ये जातपंचायतीचे वर्चस्व स्पष्ट होते.

**2. किशोर काळे (2009)[13]–**

किशोर काळे हे डॉक्टर असून त्यांनीही आत्मचरित्र लिहिले आहे. ही कथा आहे एका निरागस मुलास समाजाने नाकारलेल्या, गरिबीने लाचार झालेल्या, आई–बापाच्या प्रेमापासून वंचित राहिलेल्या व कोल्हाटी समाजात एका नाचणारणीच्यापोटी जन्म घेऊन डॉक्टरी शिकलेल्या पोराची आहे. या पुस्तकात किशोर काळे यांनी जन्मल्यापासून ते उच्च शिक्षण होईपर्यंत कोल्हाटी समाजातील नाचणारणीचा मुलगा म्हणून त्यांना कशा पध्दतीने उपेक्षिताचे, दारिद्रयाचे जीवन जगावे लागले याचे प्रत्यक्ष वर्णन केले आहे. या पुस्तकातून खरोखरच समाजामध्ये कलावंतीनीचे गौण स्थान, तिच्याकडे असणाऱ्या वासनेच्या नजरा, तिला बाहयच नव्हे तर कुटुंबातून होणारा त्रास याची जाणीव होते. काळे यांनी स्वतः भोगलेल्या जीवनातून व लेखनातून त्यांना कलावंतीन स्त्रीबद्दल असलेली



Scanned by CamScanner

आत्मीयता व सहानुभूती दिसते. म्हणून पुस्तकाच्या मनोगतात ते लिहितात, "वेश्या म्हणजे पैशासाठी रोज अनेक व्यक्तिंशी संबंध ठेवणारी पण या कोल्हाटयाच्या स्त्रिया त्यांना कोणी सांभाळणारा असेल तर लग्नाची स्त्रीसुध्दा पवित्र वागणार नाही इतक्या निष्ठेने त्या व्यक्तिशी वागतात. अशा नाचणारणीला तुम्ही वेश्या म्हणता! त्या वेश्या नसतात तुमच्या नजरा वेश्या झालेल्या असतात". यामधून त्यांनी कलावंतीन स्त्रीच्या प्रामाणिकपणाचा व उजळ प्रतिमेचा दाखला दिल्याचे दिसते.

**3. मधू कांबीकर (2012)[14]–**

मधु कांबीकर या कलावंतीन हिंदी व मराठी चित्रपट क्षेत्रातील नायिका म्हणून सुप्रसिध्द आहेत. त्यांनी आपल्या 'मधुरंग' या आत्मचरित्रात्मक पुस्तकात आपल्या कलावंत जीवनाचा लेखाजोखा मांडला आहे. कोल्हाटी जमात या भटक्या जमातीतील असणारया मर्यादा, उपेक्षित दृष्टिकोन यावर मात करीत कांबीकर यांनी प्रचंड मेहनत घेऊन चढत्या यशाची उंच कमान पार केली आहे. त्यांच्या या आत्मचरित्रातून कलावंतीन म्हणून जीवन जगत असताना सोसाव्या लागणाऱ्या हाल–अपेष्टा, संकुचित दृष्टिकोन, बरे–वाईट अनुभवांचे दर्शन होते. जमातीची त्याकाळी असणारी मागास स्थिती असूनही केवळ कलावंतीन न राहता त्यांनी मोठया पडद्यावर आपली छाप उमटवली. त्यांचे हे आत्मचरित्र खरोखरच कोल्हाटी जमातीतील तरुण मुले–मुलींना प्रेरणादायी ठरणार आहे व जीवनाच्या वाटचालीसाठी मार्गदर्शक आहे तसेच कलावंतीनीकडे समाजाचा तिरस्काराचा दृष्टीकोन कमी होण्यास मदत होते.

**निष्कर्ष–**

1. कोल्हाटी जमातीविषयीचे साहित्य दुर्मिळ व अत्यल्प आहे.
2. निवडक साहित्यामध्ये कोल्हाटी जमातीचे सामाजिक व सांस्कृतिक गुणवैशिष्टयांचे दर्शन घडते.
3. साहित्याच्या माध्यमातून कोल्हाटी जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक स्थान मोलाचे व महत्वपूर्ण असल्याचे दिसते.
4. कोल्हाटी ही कलावंत जमात असून नृत्य, मनोरंजनाचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा चालवताना दिसते.

**संदर्भ सूची –**

1. Gazzater of 'The Bombay Presidency' (Ahmadnagar District) Vol XVII Gov. Central Press, Bombay, 1884 p.no. 180
2. Syed Siraj Ul Hasan, 'The Caste & Tribes of H.E.H., The Nizam's Dominions', Vol-I, The Time press Bombay, 1920, p. no. 182
3. R.V.Rusell & Harilal, 'The Tribes & Castes of the central provinces of India, Vol- III, Cosmo publications, Delhi, 1975, p.no. 529
4. R. E. Enthoven, 'The Tribes & Castes of Bombay' Asian Education services, New Delhi, F.P. 1922, Re.p.1990, P.No.237.
5. त्रिं.ना.अत्रे, 'गावगाडा', वरदा बुक्स, पुणे प्र.आ. 1915, तृ.आ.1989, पुर्नमुद्रण 1995, पृ.क्र.253



Scanned by CamScanner

6. K.S.Singh, 'PEOPLE OF INDIA', National Series Volume V, India's Communities, Oxford University Press, Mumbai, 1998, p.no. 1769.
7. गेविंद कालेलकर, 'मुंबई इलाख्यातील जाती', वरदा प्रकाशन, पुणे, प्र.आ.1928, द्वि.आ.1999, पृ.क.42
8. रामनाथ चव्हाण, 'जाती आणि जमाती', मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, प्र.आ.1989, ति.आ.2000, पृ.क.34.
9. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत',खंड–1, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे,2002, पृ.क.73
10. सतीशकुमार जाधव, 'कोल्हाटी समाज आणि संस्कृती', लोकविद्या प्रकाशन, परभणी, प्र.आ.2010, पृ.क.27
11. प्रभाकर मांडे, 'गावगाडयाबाहेर', गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, 2017,पृ.क.117
12. गोपीचंद पवार, 'कोल्हाट उडी',शब्ददान प्रकाशन, अहमदनगर,2017, पृ.क.117
13. किशोर काळे, 'कोल्हाटयाचं पोर', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ.1994, पुर्नमुद्रण 2009,
14. मधु कांबीकर, 'मधुरंग', संस्कृती प्रकाशन, पुणे, प्र.अ. 2012.



Scanned by CamScanner